# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## नोंदणीकृत पदवीधर नोंदणी यादीत व पदवीधर मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्याबाबत Online अर्ज भरण्याबाबतच्या सूचना

१. नोंदणीकृत पदवीधर नोंदणी यादीत व पदवीधर मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्याकरिता प्रथम विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील University Election 2017 या लिंकवर जावे.

२. ज्या पदवीधरांनी यापूर्वी नोंदणीकृत पदवीधर व पदवीधर मतदार म्हणून नोंदणी केलेली नाही अशा पदवीधरांनी नोंदणीकृत पदवीधर नोंदणी यादीत व पदवीधर मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्यासाठी Online application Registered Graduates and Voter's Enrollment येथे ऑनलाईन अर्ज भरावा.

३ विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधर यादीतील ज्या पदवीधरांनी दि.२६/६/२०१५ ते दि.३०/७/२०१५ या कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी केली नाही त्यांनी नोंदणीकृत पदवधीर यादीतील आपला पदवीधर नोंदणी क्रमांक घेवून त्याआधारे Online application for Voter's Enrollment या लिंक वरील मतदार नोंदणी अर्ज भरावा.

४. सदर ऑनलाईन अर्ज भरत असताना खाली दिलेल्या एकूण ९ विद्याशाखा असून त्यामध्ये समाविष्ट असणारे विषय दर्शविलेले आहेत. त्यानुसार अर्ज भरताना योग्य ती Faculty नमूद करावी.

   १. Faculty of Arts & Fine Arts (कला व ललितकला विद्याशाखा):- मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड, अर्धमागधी, संस्कृत इत्यादी.

   २. Faculty of Social Sciences (सामाजिक शास्त्रे विद्याशाखा):- समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, समाजकार्य, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र इत्यादी.

   ३. Faculty of Science (विज्ञान विद्याशाखा):- पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, गृहशास्त्र, भूगोल, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र इत्यादी.

   ४. Faculty of Commerce (वाणिज्य विद्याशाखा):- कॉमर्स.

   ५. Faculty of Education (शिक्षणशास्त्र विद्याशाखा):- बी.एड., बी.पी.एड., बी.ए. बी.एड.

   ६. Faculty of Law (विधी विद्याशाखा):- एल.एल.बी.

   ७. Faculty of Engineering & Technology (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा):- बी.ई., आर्किटेक्चर, फार्मसी इत्यादी.

   ८. Faculty of Medicine (वैद्यकीय विद्याशाखा):- एम.बी.बी.एस.

   ९. Faculty of Ayurvedic and Homeopathic Medicine & Surgery:- बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.

५. आपणास मतदान केंद्र निवडण्यासाठी स्क्रिनवर मतदान केंद्राची जिल्हानिहाय यादी दिसून येईल. त्यापैकी आपणास आपले मतदान कोणत्या मतदान केंद्रावर करावयाचे आहे ते पसंतीक्रमानुसार मतदान केंद्र नोंद करावे.

६. ऑनलाईन अर्जातील सर्व माहिती भरल्यानंतर लक्षात राहील असा युजर नेम आणि पासवर्ड भरावा. त्यानंतर Click to save बटन दाबावे. अर्ज save केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्यानंतर Click here to pay fees online या लिंकवर जाऊन शुल्क भरावे. शुल्क भरल्यानंतर Print form यावर जाऊन अर्जाची A4 साईज प्रिंट घ्यावी व त्यानंतर Print payment receipt या लिंक वरून पैसे भरल्याच्या पावतीची प्रिंट घेऊन अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून सदर अर्ज दि.२७ जून, २०१७ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत विद्यापीठात जमा करावे. अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७. आपण दिलेला युजर नेम व पासवर्ड वापरून नंतर आपणास आवश्यकता वाटल्यास लॉगिन करून अर्ज प्रिंट करू शकता.

**८. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक २५ जून,२०१७ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यत आहे.**